| | |
|---|---|
| शासन ननर्णय क्र.सी.बी.सी.-<br>१०/२०१७/प्र.क्र.०२/मावक नि.०४ जून, २०१८ चे<br>पनिनशष्ट “अ”<br><br>**THE COMPANIES ACT, 2013**<br>**COMPANY LIMITED BY GUARANTEE AND NOT HAVING SHARE CAPITAL**<br>**MEMORANDUM OF ASSOCIATION**<br>**OF**<br>**CHHATRAPATI SHAHU MAHARAJ RESEARCH, TRAINING AND HUMAN DEVELOPMENT INSTITUTE**<br><br>I) The name of the Company is **‘Chhatrapati Shahu Maharaj Research, Training and Human Development Institute’** (hereinafter referred to as ‘the Company’)”<br><br>II) The registered office of the Company will be situated in the State of Maharashtra, within the jurisdiction of Registrar of Companies, Pune<br><br>III) The objects for which the Company is established are:<br><br>**(A) MAIN OBJECTS TO BE PURSUED BY THE COMPANY ON ITS INCORPORATION ARE:** | शासन निर्णय क्रं. सी.बी.सी.–१०/२०१७/प्र.क्र.<br>०२/मावक दि. ०४ जून, २०१८ चे<br>परिशिष्ट ‘‘अ’’<br><br>**कंपनी अधिनियम, २०१३**<br>**जिचे भागभांडवल नाही अशी हमीव्दारे मर्यादीत कंपनी**<br>**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेचा संस्थापन ज्ञापनपत्र/ मेमोरेंडम ऑफ असोसिएशन**<br><br>१. कंपनीचे नाव **‘छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था’** असे आहे. (यापुढे जिचा उल्लेख ‘‘कंपनी’’ असा करण्यात आला आहे.)<br><br>२. कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्र राज्यात आणि कंपनी निबंधक, पुणे यांचे अधिकारक्षेत्रात स्थित असेल.<br><br>३. कंपनी ज्यासाठी स्थापित करण्यात आलेली आहे ती उद्दीष्टे खालीलप्रमाणे –<br><br>**(अ) कंपनीची स्थापना झाल्यावर कंपनीने ज्याचा पाठपुरावा/पूर्तता करावयाची आहे अशी मुख्य उद्दीष्टे खालीलप्रमाणे –** |
| 1) To study and understand the issues related to social, educational & economic development of the members/ families of ***Maratha, Kunbi, Kunbi Maratha, Maratha Kunbi*** (herein after referred to as ‘the Target Groups’) and to suggest various measures for the same to the government; to develop and maintain the Chhatrapati Shahu Maharaj Research, Training and Human Development Institute (SARTHI) as a premier research, training and human development institute in India and to undertake various research, training, human development and other activities for social, educational, economic and cultural development of | १) मराठा, कुणबी, कुणबी मराठा, मराठा कुणबी (यापुढे ज्यांचा उल्लेख ‘लक्षितगट’ असा करण्यात आलेला आहे) यातील सभासद/कुटुंबांच्या संबंधित सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाशी संबंधित बाबींचा अभ्यास करून त्या समजावून घेणे आणि त्याकामी शासनास विविध उपाय सुचविणे, भारतातील मुख्य संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्था म्हणून छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था विकसित करून व्यवस्थापन करणे आणि लक्षितगटाचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकास करण्यासाठी विविध संशोधन, प्रशिक्षण, मानव विकास आणि इतर |

| | |
|---|---|
| the Target Groups. | कार्ये हाती घेणे. |
| 2) To undertake various surveys; research including action research; evaluations; skills development training and capacity building for employment, self-employment, entrepreneurship, establishing and developing industrial units including agricultural, industrial units; activities to establish, develop, maintain and administer data banks, libraries, knowledge banks, study and coordination circles for various fields including agriculture and cooperative research and study institutions, centers of education & training in various fields; to establish guidance and counselling centers for students, scholars, entrepreneurs, farmers and disadvantaged sections of women; and to impart training, coaching, etc. for various competitive exams, career development, jobs, etc.; and to institute and grant awards, stipends, scholarships, fellowships, etc. to improve social, educational and economic conditions of the Target Groups. | २) विविध सर्वेक्षण कामे, कृतिसंशोधनासह संशोधन, मुल्यमापन कार्यक्रम हाती घेणे, रोजगार, स्वयंरोजगार, उद्योजकता विकास, कृषि औद्योगिक घटकांसह इतर औद्योगिक उपक्रमांची उभारणी व विकास करणे, यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम, क्षमताबांधणी करणे, माहिती पेढी/डेटा बँक, वाचनालये, ज्ञान पेढी/नॉलेज बँक तयार/विकसित करून त्यांचे योग्य व्यवस्थापन व उपयोजन करणे. शेती व सहकार यांच्या आंतर्भावासह विविध क्षेत्रांबाबत संशोधन व अभ्यासकेंद्र स्थापन करणे, शिक्षणासाठी आणि विविध क्षेत्रातील प्रशिक्षणासाठी केंद्र स्थापन करणे आणि उपेक्षित घटकातील महिला यांच्यासाठी विविध प्रकारच्या स्पर्धा परिक्षा, व्यवसाय—मार्ग विकास, नोक—या वगैरेकामी मार्गदर्शन आणि समुपदेशन केंद्रे स्थापन करणे आणि बक्षिसे, विद्यावेतन, शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती वगैरे देणे, या माध्यमातून लक्षितगटाचे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकास करणे. |
| 3) To undertake action research and carry on various programs, activities, etc. pertaining to social planning, various spheres of social sciences for acquiring sound and professional expertise in various fields including constitutional duties and rights of citizens; equity and social justice; removal of gender bias, caste bias, race bias and superstitions; promotion of national integration and scientific temperament; promotion of brotherhood, communal harmony and peaceful co-existence; promotion of cleanliness and sanitation, inter-caste marriages, group and simple marriages, de-addiction and awareness of substance abuse in society, women empowerment; eradication of dowry, jaat- panchayats, social-boycott and domestic violence; and to undertake various educational & awareness programs, using print, electronic other type of material and media related to these fields. | ३) नागरीकांची घटनात्मक कर्तव्ये आणि हक्क, समता, लिंग / जात /वंशाधारित भेद व अंधश्रद्धा यांचे उच्चाटन करणे, सामाजिक न्याय प्रस्थापित करणे, राष्ट्रीय एकात्मता आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रसार करणे, बंधूभाव, जातीय सलोखा आणि शांततामय सहअस्तित्व वृद्धींगत, स्वच्छता आणि आरोग्य, आंतरजातीय विवाह, सामुहिक आणि साधी लग्ने यांचा प्रचार करणे, व्यसनमुक्ती आणि समाजाने धिक्कारलेल्या बाबींबाबत जनजागृती करणे, महिला सक्षमीकरण, हुंडा बंदी, जात पंचायत, सामाजिक बहिष्कार आणि कौटुंबिक हिंसाचार वगैरे या बाबींचे शिक्षण देणारे जनजागृती करणारे उपक्रम हाती घेणे, त्यासाठी सामाजिक नियोजन, समाज शास्त्रातील याउपर नमूद केलेल्या विषयांकरीता समग्र/सर्वंकष आणि व्यावसायिक तज्ञता मिळविणे आणि त्याकामी कृतिसंशोधन कार्यक्रम, विविध उपक्रम व कार्य हाती घेणे त्याकामी मुद्रण, इलेक्ट्रॉनिक आणि इतर प्रकारच्या साधनांचा आणि सदरील क्षेत्रामधील संबंधित |

| | |
|---|---|
| | माध्यमांचा वापर करणे. |
| (B) OBJECTS INCIDENTAL OR ANCILLARY TO THE ATTAINMENT OF THE MAIN OBJECTS. | **(ब) मुख्य उद्दीष्टे साध्य करणेकामी सहाय्यकारी किंवा तद्नुषंगिक असतील अशी उद्दीष्टे –** |
| 1) To appeal and apply for funds, etc. in the furtherance of the objects of the Company and to accept and utilize grants, subscriptions, donations, gifts, bequests, etc. from Government Corporations / Trusts / Societies, State Government, Central Government, Private or Non-Government Organizations/ Trust/ Societies/ Agencies, etc. or any person for fulfillment of the objects of the Company. | १) कंपनीच्या उद्दीष्टांचे अनुषंगाने निधी, वगैरे मिळविणेबाबत आवाहन व अर्ज करणे आणि कंपनीची उद्दीष्ट्ये साध्य करणेकामी शासन, महामंडळे / न्यास / संस्था, राज्य शासन, केंद्र शासन, खाजगी अगर निम–सरकारी संस्था / न्यास / संस्था / एजन्सी वगैरे किंवा इतर कोणत्याही व्यक्ती यांच्याकडून अनुदान, वर्गणी, दान, बक्षीस, मृत्यूपत्रित दान वगैरे स्विकारणे आणि त्याचा वापर करणे. |
| 2) To make rules, regulations and by-laws for the conduct of affairs of the Company and to add or rescind the same from time to time. | २ कंपनीचे कामकाज चालविण्यासाठी नियम, नियमावल्या व उपविधी तयार करणे व त्यामध्ये वेळोवेळी दुरूस्त्या करणे अगर वगळणे. |
| 3) To evolve, develop and function as national level modal institute, working for the cause of development of the Target Groups. | ३ लक्षित गटाच्या विकासासाठी काम करणारी राष्ट्रीय पातळीवरील आदर्श संस्था म्हणून नावारूपास येणे, विकसित होणे व तसे कार्य करणे. |
| 4) To plan, promote and undertake various activities, projects, programs, schemes, etc. on its own or in collaboration with or through PP & PP (Public, Private & Peoples Participation) mode or through any other organization, company, institute, government organizations, semi government organization or other agencies or through group of youths / self -help groups/ entrepreneurs, as may be approved by the Board of Directors to fulfill the objects of the Company. | ४ कंपनीचे संचालक मंडळ मान्यता देतील त्यानुसार स्वत: अगर पीपी आणि पीपी (पब्लिक / सार्वजनिक–खाजगी/प्रायव्हेट आणि लोक सहभाग/पिपल्स पार्टीसिपेशन) या माध्यमातून किंवा इतर कोणत्याही संघटना, कंपनी, संस्था, शासकीय संघटना, निम शासकीय संघटना किंवा इतर कोणत्याही यंत्रणा वा युवा गट/स्वयं–सहाय्य गट / उद्योजक यांच्याशी संलग्न होऊन कंपनीची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विविध योजना आखणे, त्यांचा प्रसार करणे या अनुषंगाने विविध कामे, प्रकल्प, उपक्रम, योजना वगैरे हाती घेणे. |
| 5 To undertake various activities, projects, programs, schemes, etc. on its own or in collaboration with government agencies, semi-government agencies, private organisations, etc. for the purposes which are conducive to its objects. | ५. संस्थेच्या उद्देशांशी हितावह असतील अशा विविध प्रकारचे उपक्रम, प्रकल्प, कार्यक्रम, योजना वगैरे स्वत: किंवा शासकीय, निमशासकीय आणि खाजगी संस्था वगैरे यांचे सहयोगाने हाती घेणे. |

| | |
|---|---|
| 6 To undertake various programs including communication skills, soft skills, general awareness, linguistic competence including proficiency in English, confidence building, career guidance, counselling, skill, aptitude, etc. for the students of SSC, HSC and graduate and higher level. | ६ दहावी आणि बारावीतील तसेच पदवी आणि उच्च वर्गातील विद्यार्थ्यांसाठी संवाद कौशल्य, सुलभ कौशल्ये, सर्वसाधारण जागरूकता, भाषिक क्षमता ज्यामध्ये इंग्रजी भाषेतील नैपुण्य, आत्मविश्वास वाढविणे, व्यवसायिक–मार्ग मार्गदर्शन, समुपदेशन, कौशल्य, अभिवृत्ती वगैरे यांसारखे विविध उपक्रम हाती घेणे. |
| 7 To serve as the apex institute for the collection and dissemination of information regarding research on social, educational and economic development of various communities of the Target Groups. | ७ लक्षित गटातील विविध समुदायांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाच्या संशोधानाशी संबंधित माहितीचे संकलन करणे आणि तिचा प्रसार करण्याबाबतची सर्वोच्च संस्था म्हणून काम करणे. |
| 8 To undertake special and pilot projects including 'Kisan Mitra', Kaushalya Vikas Doot, Tara Doot (Women Empowerment Doot), Sant Gadge Baba Doot (Swacchata & Vyasan Mukti Doot), Sanvidhan Doot, Savitri Doot, etc. from time to time, for creating awareness on various issues. | ८ विविध मुद्दयांबाबत जनजागृती करणेकामी, 'किसान मित्र', 'कौशल्य विकास दूत, तारा दूत (महिला सक्षमीकरण दूत), संत गाडगेबाबा दूत (स्वच्छता आणि व्यसन मुक्ती दूत), संविधान दूत, सावित्री दूत वगैरे सारखे विशेष आणि पथदर्शी प्रकल्प वेळोवेळी हाती घेणे. |
| 9 To undertake, on its own or in collaboration with other institutes; or to sponsor, residential or non- residential special coaching programs for services in Defence, Judiciary and other public and private sectors in the country as well as job opportunities abroad. | ९ देशातील संरक्षण, न्यायिक आणि इतर सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रामध्ये सेवा/नोकरीच्या संधी अनुषंगाने तसेच परदेशात कामाची संधी मिळविण्याच्या उद्देशाने, स्वत: अगर इतर कोणत्याही संस्था यांचे सहयोगाने निवासी किंवा अनिवासी विशेष प्रशिक्षण उपक्रम हाती घेणे वा प्रायोजिकत्व करणे. |
| 10 To carry on operational and policy-oriented research, to evolve ideas and concepts appropriate to the local, State and national environment, and to formulate and suggest policy alternatives for social, educational and economic development of the Target Groups. | १० लक्षित गटाचा सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकास करण्याचे अनुषंगाने स्थानिक गरजेनुसार राज्य आणि राष्ट्रीय वातावरणात अनुकुल कल्पना आणि संकल्पनांचा विकास करणेसाठी क्रियात्मक आणि धोरणात्मक संशोधन करणे आणि त्यानुसार पर्यायी धोरणांची निर्मिती करणे आणि ते सुचविणे. |

| | | |
|---|---|---|
| 11 | To establish a Centre of Excellence for coordination of research, extension/dissemination and training in the field of agriculture including allied fields such as cooperative initiatives, processing, storage, value addition, branding, forward and backward linkages, branding, marketing, export etc. of agricultural products; soil, water and gene agriculture crops' gene pool & biodiversity conservation, and other fields related to the development of the Target Groups. | ११ कृषि तसेच कृषिसंलग्न क्षेत्र म्हणजेच सहकार उपक्रमशीलता, प्रक्रिया, साठणूक, मूल्यवर्धन, ब्रॅन्डींग/चिन्हांकन, पुढचा आणि मागचा दुवा, पुढाकार, चिन्हांकन, विपणन, शेतमाल निर्यात वगैरे, मृद् व जलसंधारण, जनुक कोष/जीन पुल आणि जैववैविधतेचे संरक्षण आणि लक्षित गटाचे विकासाशी संबंधित इतर क्षेत्रे याबाबत संशोधन, विस्तार/प्रसार आणि प्रशिक्षण या संदर्भात समन्वयासाठी उत्कृष्ठ केंद्र स्थापित करणे. |
| 12 | To establish, develop and maintain a resource & research center (using the principles of e-governance) that will pool the best expertise through studies, data mining, etc.; pertaining to cropping patterns, farming, processing, value additions, marketing, etc.: to help the farmers and villagers through farm specific, need based, timely, demand driven advise and knowledge and to build up the capacity of farmer Groups to be self-reliant and adopting self-sustainable agriculture practices.. | १२ पिक रचना, पिक पद्धती, प्रक्रिया, मूल्यवर्धन, विपणन वगैरें शी संबंधित सर्वोत्कृष्ट तज्ञता, अभ्यास, माहिती संशोधन, विश्लेषण वगैरेच्या माध्यमातून मिळविणेकामी स्त्रोत आणि संशोधन केंद्रे (ई–गर्व्हनन्स या तत्वांचा वापर करून) स्थापन करून, त्यांचा विकास आणि त्यांची देखभाल करणे, ज्यायोगे विशिष्ट शेती, गरजांवर आधारीत, वेळेनुरूप मागणीनुसार, सल्ला आणि ज्ञान उपलब्ध रून देणेकरीता शेतकरी आणि गावक–यांची मदत करणे आणि स्वावलंबी आणि स्वयंशाश्वत शेतीच्या पद्धतींचा अवलंब करण्यासाठी शेतकरी गटाची क्षमता वाढविणे. |
| 13 | To encourage the famers and create awareness for use of modern technologies in agriculture including precision farming and protected cultivation; group activity in farming, storage, processing, development of value chain by connecting farmers directly with the consumers, marketing and export of their products. | १३ अचूकमाप शेती, संरक्षित लागवड, शेतीतील गट उपक्रम, साठवणूक, प्रक्रिया, थेट शेतकरी ते ग्राहक जोडणीव्दारे मूल्य साखळी विकसित करून शेतमालाचे विपणन आणि शेतमालाचे निर्यातीस माध्यमांव्दारे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करणेकामी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणे यांसह शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत जागृती निर्माण करणे. |
| 14 | To study various aspects of agricultural exonomy,price support,system of agricultural products, government support to agriculture occupation, etc., sustainable agriculture and develop robust, data for government for evolving better policies with specific focus on governmental support for farming. | १४ विशेषत: शेती व्यवसायाला शासनसहाय्याची अधिक चांगली धोरणे निर्माण करणेकरिता कृषीअर्थशास्त्राच्या विविध अंगांचा/पैलूंचा अभ्यास करणे, जशी कृषीउत्पादनांची आधारभूत किंमत पद्धती, शेतीव्यवसायाला शासनसहाय्याचे धोरण, शाश्वत शेतीपद्धती इ. व्दारे ठोस डेटा (माहिती) संकलित करून विकसित करणे. |
| 15 | To undertake research and documentation activities, on its own or in coordination with other agencies, on the aspect of conservation of gene pool and bio diversity of agriculture crops | १५ जनुक कोष, शेतीपिके आणि पशुधनातील जैवविविधतेचे संरक्षण आणि शेतातील कीडींचे जैविक नियंत्रण यासाठी स्वत: किंवा इतर कोणत्याही |

| | | |
|---|---|---|
| | and domestic animals and biological control of pests in agriculture. | अभिकरणे यांच्या सहयोगाने संशोधन आणि दस्तएवजीकरण तयार करण्याचा उपक्रम हाती घेणे. |
| 16 | To study and undertake research projects, on its own or in coordination with other agencies, to find out the main causes of rural distress, agrarian distress, addiction, etc. and to undertake large scale programs including awareness, campaigns, counselling, training, etc., for building their self-confidence and reducing the distress. | १६ ग्रामीण क्लेष (मुख्य कारणांचा शोध घेणे), कृषी आपदां, व्यसनाधिनता वगैरे बाबींचा अभ्यास करणे, त्याबाबतचा संशोधन प्रकल्प हाती घेणे, तसेच त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि ताण कमी करणे यासाठी जागृती, शिबिर, समुपदेशन, प्रशिक्षण वगैरे उपक्रम स्वत: किंवा इतर कोणत्याही यंत्रणेच्या सहयोगाने मोठया प्रमाणावर हाती घेणे. |
| 17 | To undertake and promote rural tourism, agro-tourism, agro-forestry tourism and forestry tourism on its own or in collaboration with other agencies and to create awareness about the same in Target Groups. | १७ ग्रामीण पर्यटन, कृषी–पर्यटन, कृषी–वन पर्यटन आणि वन–पर्यटनासारखे उपक्रमाबाबत लक्षित गटात जागृती करून त्यांचेमार्फत अशा उपक्रमास चालना देणेकामी स्वत: किंवा इतर कोणत्याही यंत्रणांसह असे उपक्रम हाती घेणे आणि त्यांचा प्रसार करणे. |
| 18 | To build confidence of the Target Group families dependant on agriculture through counselling and various inspiring, educational and awareness programs using trained personnel as well as print, electronics, social media, helplines, counselling centers, etc. | १८ कृषिवर आधारित लक्षित गटाच्या कुटुंबाचा आत्मविश्वास वृद्धींगत करणेसाठी समुपदेशन केंद्र, प्रशिक्षित व्यक्ती तसेच छापील, ईलेक्ट्रॉनिक माध्यमे, सामाजिक माध्यमे, मदतवाहिन्या वगैरेंचा वापर करून समुपदेशन आणि विविध प्रेरणादायी, शैक्षणिक आणि जागरूकतेच्या जागृती उपक्रम राबविणे/हाती घेणे. |
| 19 | To create Land Cadre for awareness and education for conservation and sustainable use of agriculture land in the State. | १९ राज्यातील शेतजमीनीचा शाश्वत वापर आणि संवर्धनाचे शिक्षण आणि जागृतीसाठी जमीन संवर्गाची निर्मिती करणे. |
| 20 | To conduct research and surveys, collect data and to evolve and modify/ reform time to time, criteria for selection of skill development training service providers, training costs, stipends/ free lodging & boarding facilities, etc. for trainees as well as criteria to monitor implementation of skill development training programs, through Program Management Unit of experts. | २० संशोधन आणि सर्वेक्षण करणे, माहितीचे संकलन करणे आणि त्यामध्ये वेळोवेळी दुरूस्त्या/सुधारणा करणे आणि त्यांचा विकास करणे, कौशल्य विकास प्रशिक्षण सेवा पुरवठादारांच्या निवडीचे निकष, प्रशिक्षणार्थीसाठी प्रशिक्षणाचा खर्च, विद्यावेतन/मोफत लॉजिंग आणि बोर्डींगची सुविधा वगैरें निश्चित करणे तसेच तज्ञांच्या उपक्रम व्यवस्थापन गटाच्या माध्यमातून प्रस्थापित करण्यात आलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षण उपक्रमावर नियंत्रण ठेवण्याचे निकष ठरविणे. |
| 21 | To plan and undertake various skill development programs on its own or through training service providers, for employment, self-employment, entrepreneurship and establishing small and medium industrial units | २१ लक्षित गटाच्या सदस्यांच्या माध्यमातून लघु आणि मध्यम औद्योगिक घटकांची स्थापना करणे, रोजगारनिर्मिती, स्वयं–रोजगार, उद्योजकता याकामी स्वत: किंवा इतर कोणत्याही प्रशिक्षण |

| | |
|---|---|
| by the members of the Target Groups. | सेवा पुरवठादार यांचे सहयोगाने विविध कौशल्य विकास उपक्रमाची योजना आखणे आणि ते हाती घेणे. |
| 22 To raise funds under Corporate Social Responsibility (CSR) and to utilize the same for social, educational and economic development including infrastructure development of the Target Groups | २२ कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी (सीएसआर)/ सामाजिक जबाबदारी याअंतर्गत निधी उभा करणे आणि तो लक्षित गटाचा पायाभूत विकास करण्यासह त्याच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी देखील वापरणे. |
| 23 To evolve, develop and update Knowledge Bank through institutional networking, data mining, conferences, workshops, seminars, discussions, symposia, visits, study tours, surveys, etc. and to use the Knowledge Bank for guidance and counseling to the members of the Target Groups | २३ संस्थात्मक जाळे, माहिती संकलन, परिसंवाद, कार्यशाळा, शिबिरे, चर्चा, भेटी, अभ्यास दौरे, सर्वेक्षण इत्यादीच्या माध्यमातून ज्ञानकोष/नॉलेज बँकची स्थापना करणे, तिचा विकास करणे आणि ती अद्यावत राखणे आणि अशी ज्ञान पेढी/नॉलेज बँक ही लक्षित गटातील सदस्यांना मार्गदर्शन करणेकामी तसेच त्यांचे समुपदेशन करणेकामी वापरणे. |
| 24 To undertake scheme/drive for sponsoring special tutorial/coaching, to the students of the Target Groups in Classes 9, 10, 11 and 12 to enable them score better at academic examinations. | २४ लक्षित गटातील इयत्ता ९वी, १०वी, ११वी आणि १२ वी या वर्गातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या शैक्षणिक परिक्षांमध्ये अधिक चांगले गुण मिळवावेत याकीरता विशेष शिकवणी/अध्यापन देण्यासाठी प्रायोजकाची योजना हाती घेणे. |
| 25 To award fellowships for higher studies including M.Phil., Ph.D. and Post- Doctoral studies to the candidates of the Target Groups. | २५ लक्षित गटातील उमेदवारांना एम.फील, पीएच.डी. आणि पदव्युत्तर डॉक्टरल यांसारख्या उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती प्रदान करणे. |
| 26 To establish, award and administer Rajarshi Shahu Overseas Fellowships to encourage meritorious and brilliant students of the Target Groups for higher learning and research abroad. | २६ लक्षित गटातील गुणवंत आणि हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणसाठी तसेच परदेशी संशोधनासाठी पाठविणेकामी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राजर्षी शाहू ओव्हरसिज फेलोशिप ची स्थापना करणे, प्रदान करणे आणि त्याचे प्रशासन करणे. |
| 27 To promote, undertake, sponsor various projects, programs, activities, psychological tests, aptitude tests etc. for tutorials and coaching, etc. for various competitive examinations, professional courses, entrance tests, foreign courses, etc. for the members of the Target Groups and to undertake such projects, programs, activities, etc. specially for the girl candidates from the Target Groups. | २७ लक्षित गटातील सदस्यांसाठी विविध स्पर्धा परिक्षा, व्यावसायिक अभ्यासक्रमे, प्रवेश परिक्षा, विदेशी अभ्यासक्रमे वगैरेंसाठी शिकवण्या आणि अध्यापन वगैरे सुरू करणे, त्याचा प्रसार करणे आणि त्याकामी विविध प्रकल्प, उपक्रम, कार्य, मानसशास्त्रीय/चिकित्सक चाचणी, अभिवृत्ती चाचणी वगैरे, विविध प्रकल्प हाती घेणे, त्यांचे प्रयोजकत्व करणे आणि अशा प्रकारे हाती घेतलेले प्रकल्प, उपक्रम, कार्य वगैरे लक्षित |

| | |
|---|---|
| | गटातील विशेषत: महिला उमेदवारांसाठी राबविणे. |
| 28 To organize trainings, discussions, workshops, seminars, awareness programs, etc. for all the stakeholders on "The Scheduled Castes and Scheduled Tribes (Prevention of Atrocities) Act, 1989" and to conduct research on various aspects including implementation of this Act. | २८ ''अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार पासून संरक्षण) अधिनियम, १९८९' यावर सर्व संबंधितांचे प्रशिक्षण, चर्चा, कार्यशाळा, शिबिरे, जनजागृती उपक्रम वगैरे योजणे आणि सदरील कायदयाच्या अंमलबजावणीसह त्यातील विविध बाजूंवर संशोधन करणे. |
| 29 To establish, develop and maintain helplines and counselling centers to help the farmers and disadvantaged sections of women. | २९ शेतकरी आणि वंचित महिलांसाठी मदतवाहिनी आणि समुपदेशन केंद्र सुरू करणे आणि ते विकसित करणे आणि त्याची देखभाल करणे. |
| 30 To undertake action research program, create awareness and undertake educational programs about constitutional duties and rights of citizens; equity and social justice; removal of gender bias, caste bias, race bias and superstitions; promotion of national integration and scientific temperament; promotion of brotherhood, communal harmony and peaceful co-existence; promotion of cleanliness and sanitation, inter-caste marriages, group and simple marriages, de-addiction and awareness of substance abuse in society, women empowerment; eradication of dowry, jaat-panchayats, social-boycott and domestic violence etc. For all these: to undertake various projects and programs including trainings, lectures, seminars, conferences, discussions, workshops, study tours, visits, symposia, radio-talk, television programs, shows, plays, functions, etc. related to the above fields. | ३० सामाजिक नियोजन, समाज शास्त्रातील विविध परिघांमध्ये योग्य आणि व्यवसायिक तज्ञता मिळविणेकामी, नागरीकांची घटनात्मक कर्तव्ये आणि हक्क, समता, लिंग / जात /वंशाधारित भेद व अंधश्रद्धा यांचे उच्चाटन करणे, सामाजिक न्याय प्रस्थापित करणे, राष्ट्रीय एकात्मता आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रसार करणे, बंधूभाव, जातीय सलोखा आणि शांततामय सहअस्तित्व वृद्धींगत, स्वच्छता आणि आरोग्य, आंतरजातीय विवाह, सामुहिक आणि साधी लग्ने यांचा प्रचार करणे, व्यसनमुक्ती आणि समाजाने धिक्कारलेल्या बाबींबाबत जनजागृती करणे, महिला सक्षमीकरण, हुंडा बंदी, जात पंचायत, सामाजिक बहिष्कार आणि कौटुंबिक हिंसाचार वगैरे या बाबींचे ज्यामध्ये समावेश होईल असे विविध कार्य, संशोधन हाती घेणे आणि विविध उपक्रम, कार्ये राबविणे अगर पार पाडणे आणि त्याकामी छापिल, इलेक्ट्रॉनिक आणि इतर प्रकारचे साहित्यांचा वापर करून आणि या क्षेत्रांशी संबंधित माध्यमांचा वापर करून विविध शैक्षणिक आणि जागरूकतेचे उपक्रम हाती घेणे. |
| 31 To institute and offer / grant National Awards to encourage individuals, organizations contributing in the above fields. | ३१ याउपर नमूद करण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये योगदान देणेकामी व्यक्ती आणि संस्थांना राष्ट्रीय पारितोषिक सुरू करणे, देणे/प्रदान करणे. |
| 32 To organize various competitions and other events for the students of various level, on the issues related to the above fields and grant awards, prizes, citations, etc. to the deserving students, with an aim to inspire the youngsters to become better citizen of India. | ३२ याउपर नमूद करण्यात आलेल्या क्षेत्रांतील मुद्दयांशी संबंधित विविध पातळीतील विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा भरविणे आणि इतर उपक्रम राबविणे आणि युवा भारताचे चांगले नागरीक बनतील या उद्देशाने योग्य त्या विद्यार्थ्यास बक्षीस, पारितोषिक, |

| | |
|---|---|
| | प्रशस्तीपत्र वगैरे देणे. |
| 33 To evolve and prescribe standards for evaluation and monitoring of various schemes and to conduct concurrent evaluations and other type of evaluations of various projects & schemes being implemented for the development of the Target Groups and to undertake evaluation of various schemes of government / semi-government / non-government organizations on consultancy basis. | ३३ लक्षित गटाच्या विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकारचे प्रकल्प आणि योजना यांचे मूल्यांकन आणि इतर प्रकारचे मूल्यांकन करणेकामी मानके निश्चित करणे आणि त्यांचे समवर्ती मूल्यांकन आणि इतर प्रकारचे मूल्यांकन करणे आणि ते विहीत करून ठेवणे आणि अशा विविध योजनांचे नियंत्रण करणे आणि सल्ला तत्वावर शासकीय /निम शासकीय /अशासकीय संस्थांच्या विविध योजनांचे मूल्यांकनाचे काम हाती घेणे. |
| 34 To evolve and develop social, educational and economic development index of various communities and, for that purpose, take up various survey and research projects and to provide consultation services to Maharashtra Backward Class Commission. | ३४ विविध समुदायांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासांचे निर्देशांक आणि विकासाची सूची तयार करणे आणि त्याकामी विविध प्रकारचे सर्वेक्षण करणे आणि संशोधन प्रकल्प हाती घेणे तसेच महाराष्ट्र मागासवर्गीय आयोगास सल्ला सेवा प्रदान करणे. |
| 35 To establish, develop and maintain databank of the individuals and families of the Target Groups and other families for evolving ideas and better planning etc. for the development of the Target Groups. | ३५ लक्षित गटांचे विकास करणेकामी अधिक चांगल्या उपक्रम/संकल्पना आणि त्यासाठी अधिक चांगले नियोजन करणेकामी, लक्षित गटातील व्यक्तींचे आणि कुटुंबांच्या आणि इतरांच्या कुटुंबाचा माहितीकोष/ बँक/डाटा–बँक तयार करणे, तिचे विकास करणे आणि तिची देखभाल करणे. |
| 36 To organize, sponsor various programs and to implement certain projects, including training, capacity building for empowerment and advancement of women of the Target Groups and to financially support meritorious women candidates in health sector, sports, arts, crafts, innovations and other activities. | ३६ लक्षित गटातील महिलांचे सक्षमीकरण करणे आणि त्यांची प्रगती करण्याचे अनुषंगाने विविध उपक्रम योजणे, प्रायोजन करणे आणि असे ठराविक प्रकल्प राबविणे जेणेकरून त्यांचे प्रशिक्षण होईल आणि क्षमता वाढेल आणि आरोग्य, क्रिडा, कला, हस्तकला, नवीकरण आणि इतर कार्यांमधील गुणवंत महिला उमेदवारांना आर्थिक सहाय्य करणे. |
| 37 To establish, develop and maintain regional and district level libraries of books, pamphlets, newspapers, periodicals, microfilms, still photographs, motion pictures, sound recordings and other, materials for study and research to all without distinction of class, caste, creed, occupation, sex or race. | ३७ पुस्तके, पत्रके, वर्तमानपत्रे, नियतकालिके, सुक्ष्मचित्रे, छायाचित्रे, चलचित्रे, ध्वनी मुद्रण आणि इतर साहित्यांचा अभ्यास आणि संशोधन करण्यासाठी समाजातील विविध वर्गातील जाती–जमाती, व्यवसायातील, लिंग–वर्णाच्या व्यक्तींना ते उपलब्ध होणेकामी क्षेत्रिय आणि जिल्हा पातळीवर त्यांची ग्रंथालये स्थापित करणे. |
| 38 To support libraries at various places in the State and to supply electronic, audio visual, print materials including books, pamphlets, posters, | ३८ राज्यामध्ये विविध ठिकाणी असणा–या ग्रंथालयांना आधार देणे आणि त्यांना याउपर नमूद केलेल्या क्षेत्रांशी संबंधित इलेक्ट्रॉनिक, दृक–श्राव्य, छापिल |

| | |
|---|---|
| booklets, etc. related to above fields, to various libraries, Gram Panchayats and other places. | साहित्य, पुस्तके, पत्रके, फलके, पुस्तिका वगैरेंचा पुरवठा विविध वाचनालये, ग्रामपंचायती आणि इतर ठिकाणी करणे. |
| 39 To establish, develop and maintain a national level library to be named as 'Rajarshi Shahu National Public Library (RSNPL)' with the following objectives:<br><br>a) To establish, develop and maintain for reference, research and home borrowing for students, researchers irrespective of race, caste, creed and religion.<br><br>b) To provide facilities for reference, research and home borrowing for students, researchers, academicians and the general public.<br><br>c) To develop and maintain library having network with other national and international major libraries and provide facilities to above groups.<br><br>d) To undertake any other connected activity like providing facilities for audio-visual shows, conferences, exhibition, etc. | ३९ याखाली नमूद केलेल्या उद्देशांसाठी राजर्षी शाहू राष्ट्रीय सार्वजनिक वाचनालय (आरएसएनपीएल) या नावाने देश पातळीवर ग्रंथालय सुरू करणे, त्याचा विकास करणे, देखभाल करणे :—<br><br>अ) संदर्भ, संशोधन, कोणत्याही जातीधर्माच्या, वर्णाच्या विद्यार्थ्यांना, संशोधकांना पुस्तक घरी घेवून जाणेकामी स्थापना करणे, त्याचा विकास करणे आणि देखभाल करणे.<br><br>ब) विद्यार्थी, संशोधक, शिक्षणार्थी आणि सर्वसाधारण जनतेस संदर्भ, संशोधन करणेकामी आणि पुस्तके घरी नेणेकामी सुविधा उपलब्ध करून देणे.<br><br>क) इतर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मुख्य वाचनालयांशी ज्यांचे संबंध/जाळे निर्माण होईल असे वाचनालय विकसित करून त्याची देखील करणे आणि याउपर नमूद करण्यात आलेल्या गटांना त्याची सुविधा उपलब्ध करून देणे.<br><br>ड) दृक—श्राव्य खेळ, चर्चासत्र, प्रदर्शन वगैरे प्रकारच्या सुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने इतर कोणतीही संबंधित कामे हाती घेणे/करणे. |
| 40 To conduct and sponsor research and to develop and publish various print, electronic and other form of materials pertaining to constitutional duties and rights of citizens; equity and social justice; removal of gender bias, caste bias, race bias and superstitions; promotion of national integration and scientific temperament; promotion of brotherhood, communal harmony and peaceful co- existence; promotion of cleanliness and sanitation, inter-caste marriages, group and simple marriages, de-addiction and awareness of substance abuse in society, women empowerment; eradication of dowry, jaat-panchayats, social-boycott and domestic violence etc. and to publish, promote, sell, distribute free of cost, display the books, pamphlets, | ४० नागरिकांची घटनात्मक कर्तव्ये आणि हक्क, समता, लिंग / जात /वंशाधारित भेद व अंधश्रद्धा यांचे उच्चाटन करणे, सामाजिक न्याय प्रस्थापित करणे, राष्ट्रीय एकात्मता आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रसार करणे, बंधूभाव, जातीय सलोखा आणि शांततामय सहअस्तित्व वृद्धींगत, स्वच्छता आणि आरोग्य, आंतरजातीय विवाह, सामुहिक आणि साधी लग्ने यांचा प्रचार करणे, व्यसनमुक्ती आणि समाजाने धिक्कारलेल्या बाबींबाबत जनजागृती करणे, महिला सक्षमीकरण, हुंडा बंदी, जात पंचायत, सामाजिक बहिष्कार आणि कौटुंबिक हिंसाचार वगैरे या बाबींचे |

| | |
|---|---|
| brochures, periodicals, research papers, magazines, newspaper, microfilms, still photographs, motion pictures, sound recordings, audio visuals, etc. and other type of material related to these fields and issues. | अनुषंगाने संशोधन करणे त्याचे प्रायोजकत्व करणे आणि त्याबाबत विविध छापिल, इलेक्ट्रॉनिक आणि इतर प्रकारचे साहित्य विकसित करून ते प्रकाशित करणे आणि अशा प्रकारचे विषय आणि बाबींचे अनुषंगाने पुस्तके, पत्रके, माहितीपत्रके, नियतकालिके, संशोधनाची कागदपत्रे, मासिके, वर्तमानपत्रे, सुक्ष्मचित्रफिती, छायाचित्रे, चलचित्रे, ध्वनी मुद्रण, दृक–श्राव्य माध्यमे वगैरे प्रकाशित करणे आणि त्याचा प्रचार करणे, त्यांची विक्री करणे, त्यांचे मोफत वितरण करणे. |
| 41 To undertake educational and training programs for youth for improving their knowledge in all spheres of above fields. | ४१ याउपर नमूद करण्यात आलेल्या सर्वच क्षेत्रांमधील युवा वर्गाचे ज्ञान वाढविणेकामी त्यांच्या शिक्षणाचे आणि प्रशिक्षणाचे उपक्रम हाती घेणे. |
| 42 To undertake various educational and awareness programs using various prints, audio visuals, electronic and other media including social media, trainings, etc. on above fields. | ४२ विविध प्रकारे छापिल, दृक–श्राव्य, इलेक्ट्रानिक आणि सामाजिक माध्यमाचा/सोशल मिडिया ज्यामध्ये समावेश होईल अशा इतर प्रकारच्या माध्यमांचा, प्रशिक्षणाचा वगैरे वापर करून याउपर नमूद करण्यात आलेल्या विषयांबाबत विविध प्रकारची शेक्षणिक आणि जागृतीचे उपक्रम राबविणे. |
| 43 To sponsor various surveys, research, study projects, translations, write ups, books, etc. related to the objectives of the Company, to the individuals and institutions. | ४३ कंपनीच्या उद्दिष्टांशीसंबंधित विविध प्रकारची सर्वेक्षणे, संशोधने, अभ्यास प्रकल्प, भाषांतर, लेखी, पुस्तके वगैरेंसाठी व्यक्तींना आणि संस्थांना प्रायोजकत्व देणे. |
| 44 To establish and run Rajarshi Shahu Study Circle at various places. | ४४ विविध ठिकाणी असणारी राजश्री शाहू अभ्यास मंडळे स्थापन करणे आणि चालविणे. |
